INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# इंग्रज व पोर्तुगीज संबंध: एक अभ्यास

## (British and Portuguese Relations – A Study)

**प्रा.डॉ. के.डी. सावंत**

इतिहास विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड (महाराष्ट्र, भारत)
E-mail: kailassawant09@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2024-98227343/IRJHIS2409003

**प्रस्तावना:**

फार प्राचीन काळापासून भारत वर्षाचे युरोपातीलरोम व्हेनिस जिनोव्हा इत्यादी नगरांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले होते. या ठिकाणांचे व्यापारी तुर्कस्तान इराण इराणचे आखात या मार्गाने हा व्यापार करत असत. पण पंधराव्या शतकात तुर्क लोकांनी तुर्कस्तान इराण आशिया मायनर इत्यादी प्रदेश जिंकूनइ.स. १४५३ मध्ये पूर्व रोमन साम्राज्याची कॉन्स्टोटिनोपल ही राजधानीही जिंकली. त्यामुळे खूष्कीच्या मार्गाने होणारा हा युरोपियन व्यापार बंद पडला तेव्हा पोर्तुगाल स्पेन इत्यादी देश भारताकडे जाणाऱ्या सागरी मार्गाचा शोध घेऊ लागले. यातूनच बार्थोला डायस, कोलंबस, वास्को -द- गामा, मेगेलान यांसारखे सागरी मार्गाचे धाडसी संशोधक निर्माण झाले. भारताकडे जाण्याच्या प्रयत्नात कोलंबसने इ.स. १४९२ साली अमेरिका खंड शोधले, तर आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून पोर्तुगालच्या वास्को-द- गामाने इ.स. १८९८ साली भारताचा किनारा गाठला.

२३ मे १४९८ रोजी वास्को-द-गामा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरात आला. भारताच्याच नव्हे जगाच्या इतिहासातील ही एक महत्त्वाची घटना ठरली. कारण या घटनेने युरोपचे भारताशी सागरी मार्गावरून प्रत्यक्ष संबंध निर्माण होऊन पुढे युरोपियांनी आणि भारत चीन इत्यादी देशाचा इतिहासबदलून टाकला. यानंतर भारतात स्पेन, डच, फ्रेंच, इंग्रज आले. काळाच्या ओघात स्पेन डच या देशाचा व्यापार भारतातील कमी झाला. परंतु पोर्तुगीज आणि इंग्रजांचा व्यापार स्थिरावलाइंग्रज आणि पोर्तुगीज यांचे व्यापारावरून संबंध भारतातील संघर्षमय राहिल्याचे दिसतेया दोन तुल्यबल देशाचा संघर्षपूर्ण संबंधाचा इतिहास अभ्यासकारासमोर व समाजासमोर जावा हा या संशोधन पेपरचा उद्देश आहे.

सोळाव्या शतकात पोर्तुगीज व इंग्रज भारतात आले पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने कोचिन राजा झामोरीन यांची भेट इ.स. १८९८ मध्ये घेतली. त्यानंतर पोर्तुगीजांचा दुसऱ्याव्हाईसरॉय आफान्सो ड अलबुकर्क यानेइ.स. १५१० मध्ये गोवा शहर व कोट घेतल्याचे दिसते. पोर्तुगीजांनीइ.स. १५२० मध्ये दीव, चौल, वसई इ. घेतल्याचे दिसते. इ.स. १५२९ मध्ये आणि त्यानंतर आगाशी, मनोर, ठाणे, मुंबई, कारंजा, बारदेश, परगणा, साष्टी (गोव्याजवळील) इत्यादी प्रदेश घेतल्याचे दिसते. दमण इ.स. १५८८ मध्ये घेतल्याचे दिसते. पोर्तुगीजांनी हा प्रदेश तोफखान्याच्या व आरमाराच्या बळावर आपल्या ताब्यात ठेवल्याचे दिसते त्यांनी आपल्या आरमारी सामर्थ्याचा गवगवा युरोपात केला व युरोपखंडातील लोकांत पूर्वेशी दळणवळण ठेवण्याबाबत एक प्रकारची भीती उत्पन्न केल्याचे दिसते. परंतु ही युरोपियांची भीती सोळाव्या शतकात शेवटी गेली आणि मग इंग्रज व डच यांनी आपली जहाजे पूर्वेकडे पाठवण्यास सुरुवात केली

इ.स. १६०० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. इ.स. १६०९ मध्ये कॅप्टन हॉकिन्स याने मोगल बादशहाकडून सुरतेस वखार घालण्याचा परवाना मिळविला. इ.स. १६११ मध्ये कोरोमांडेल किनाऱ्यावर कॅप्टन हिपॉन नामक इंग्रजाने मच्छलीपटनाजवळ पेट्टापुली येथे एक वखार घातली.

इ.स. १६११ व १६१४ यावर्षी पोर्तुगीज व इंग्रजयांच्या आरमारांचे मोठे सामने झाले व त्यात इंग्रजांसयश आल्याचे दिसते.

इ.स. १६१८ च्या सुमारास म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी बारा वर्षे इंग्रज व्यापाऱ्यांनी भारतात व्यापाराचे बस्तान उत्तम बसविल्याचे दिसते.

इ.स. १६०८ मध्ये इंग्रजांचेहेक्टर नावाचे एक जहाज प्रथम सुरतेस आले. दर्यावर त्यावेळी पोर्तुगीजांची अप्रतिहत सत्ता असल्यामुळे त्यांनी त्या जहाजातील लोकांना किनाऱ्यावरउतरण्याची मनाई केली व त्यांच्यावर हल्ला चढविला. इंग्रजांनी बोलणे लाविले की पोर्तुगीजांचा व इंग्रजांचा युरोपात स्नेहाचा तह असल्यामुळे फिरंग्यांनी असे वागणे बरे नव्हे पण पोर्तुगीजांनी हे ऐकून न घेता पकडलेले इंग्रज कैदी गोव्यात पाठवून दिल्याचे दिसते

इ.स. १६१२ मध्ये इंग्रजांच्या सुरतेस आलेल्या दोन जहाजांशी फिरंगी जहाजांची दि३० नोव्हेंबर १६१२ मध्ये लढाई झाली. त्यात इंग्रजांनी फिरंग्यांचा पराभव केला त्याचा चांगला परिणाम होऊन इंग्रजास मोगल बादशहाकडून व्यापाराकरिता सवलती मिळाल्या. इ.स. १६१४ च्या ऑक्टोबर महिन्यात इंग्रजांची चार गलबते सुरतेस आली त्यांची मदत सुरतेच्या मुसलमानांनी घेऊन फिरंग्यांची मुकाबला केलालढाई होऊन फिरंग्यांचापराभव झाला व त्यांना तह करावा लागल्याचे दिसते.

दिनांक७ जून१६१५ मध्ये फिरंग्यांनी मोघलांशी तह केला त्यात दिल्लीच्या बादशहाने इंग्रजांना व डचांना व्यापारासाठी आसरा द्यावा व मलबार चाच्यांचा हरेक बंदरात शोध करून फिरंग्यांनी त्यांचा नायनाट करावा अशी कलमे होती. तथापि इंग्रजांना हाकलून देऊन सुरत शहर काबीज करावे अशी पोर्तुगीज राजाची स्पष्ट आज्ञा गोव्याच्या व्हाईसरॉयला होती

इ.स. १६१६ च्या ऑक्टोबरमध्ये रुई फ्रेअरी ड आंद्रे या पोर्तुगीज सेनापतीच्या अधिपत्याखाली पोर्तुगीज आरमार सुरतेकडे आले. सुरतेच्या नवाबाने त्याला नजराना दिल्यावर ते आरमार खंबायताकडे गेले पुढे ते दीव व गोगो येथे जाऊन त्याने

तेथील व्यवस्था पाहिली. भारतातील आपली आरमारी हुकूमत राखण्याच्या हेतूने पोर्तुगीज मोघलांना आपल्याशी करार करण्याची विनंती करीत असल्याचे दिसते. तिच्यातील मुख्य अट इंग्रजांना मोघलांनी त्यांच्या बंदरात थारा देऊ नये अशी होती.[१] मोघलांनी ही अट कबूल केली नाही. आग्रा, सुरत वगैरे ठिकाणी पोर्तुगीजांच्या वखार असल्याच्या दिसतात. इंग्रजांनी एप्रिल १६२० मध्ये आदिलशहाकडे आपला वकील पाठवून आदिलशाहीत आपला जम बसविण्याचा प्रयत्न केला. दाभोळचा आदिलशहाचा सुभेदार मलिक याकूत याने इंग्रजांस चांगल्या रीतीने वागविल्याचे रॉबर्ट जेफ्रिज चौलहुन लंडनला आपल्या दि ५ ऑक्टोबर १६२० च्या पत्रात लिहिल्याचे दिसते.

युरोपीय शत्रूस हाकलून लावण्यासाठी पोर्तुगीजांचे फार मोठे आरमार इ.स. १६२२ मध्ये हिंदुस्थानात येताना वादळामुळे नाश पावले. त्यात मनुष्य व द्रव्यहानी ही फार झाल्याची दिसते.[2] शिवाय त्यावेळी गोव्यातील त्यांची परिस्थिती ही खालावली होती. इराणच्या शहाणे केवळ त्यांच्या क्रूर वर्तनामुळे इंग्रजांची मदत घेऊन त्यांना इराणच्या परिसरातून काढून लावल्याचे दिसते इ.स. जानेवारी १६२३ मध्ये इंग्रजांची तीन जहाजे डचांच्या आरमारी जहाजांसमवेत गोव्यासमोर येऊन उभी राहिली इंग्रजांचे पारडे जड झाले आहे असे आदिलशहास दिसताच त्याने इंग्रजांशी पोर्तुगीजांना काढून लावण्यासाठी बोलणे सुरू केले.

इंग्रजांच्या जहाजांची इ.स. १६२५ मध्ये दमण जवळ पोर्तुगीज जहाजांचे गाठ पडली तीन दिवस लढाई झाली कोणाचाच विजय झाला नसल्याचे दिसते तेव्हा ती जहाजे आपापल्या वाटेने निघून गेल्याचे दिसतात.

**इंग्रज व डच यांचा मुंबई घेण्याचा प्रयत्न असफल :**

इ.स. १६२६ ऑक्टोबरमध्ये डच व इंग्रज एक होऊन त्यांनी मुंबई बेट पोर्तुगीजांकडून घेण्याची तयारी केली मुंबईवर त्यांनी संयुक्तपणे हल्ला ही चढविला सकाळी आरमारावरून ४७० लोक किनाऱ्यावर उतरले व त्यांनी कोट व शहर सर केले. मग त्यांनी शहरात ठीकठिकाणी आगी लावून दिल्याच्या दिसतात. सर्व घरे भस्मसात झाली पण तेथील लोकांनी हल्ला होणार ह्या बातमीने आपली चीज वस्तू अगोदरच दुसरीकडे हलवलेली असल्याने ह्या इंग्रज सैनिकांस काहीच लूट मिळाली नाहीते त्या बंदरातून आपली जहाजे घेऊन परत गेल्याचे दिसते[३]

इ.स. १६३० व इ.स. १६३१ ही दोन वर्षे दुष्काळामुळे व प्लेगमुळे जरा शांततेत गेली पोर्तुगीज इंग्रज व डच यांच्या आपापसातील चढाओढीत पोर्तुगीजांचा व्यापार अगदीच कमी झाला होता त्यामुळे पोर्तुगीजांशी इ.स. १६३० मध्ये सख्य करून एकमेकांनी एकमेकांच्या व्यापारा आड न येता स्वतंत्रपणे आपला व्यापार करावा असे इ.स. १६३५ मध्ये ठरल्याचे दिसते. त्यामुळे इंग्रज व पोर्तुगीज यांच्या वखारी सुरतेत एकत्र राहिल्या होत्या. दरम्यान डचांनी पोर्तुगीजांचा उच्छेद आरंभीला हा संघर्ष तीन ते चार वर्ष चालला. इ.स. १६४० – ४१ युरोपमध्ये स्पेन व पोर्तुगाल या दोन देशात संघर्ष निर्माण होऊन पोर्तुगीजांनी स्पेनचे अधिपत्य झुगारून दिले व पोर्तुगीज स्वतंत्र झाला पोर्तुगीजांनी ताबडतोब युरोपीय व्यापारी राष्ट्रांशी मैत्रीचा तह केला पण तो भारतात अमलात यायला तीन ते चार वर्षे लागली. इंग्रजांचे लक्ष सुरत इराण इकडेच अधिक असल्याचे दिसते इ.स. १६४४ मध्ये इंग्रज व पोर्तुगीज यांच्यात मैत्री झाल्यानंतर त्यांच्या राजकीय किंवा आरमारी हालचालींना फारसा अवसर राहिला नसल्याचे दिसेत

यावेळी ईस्ट इंडिया कंपनीच्या संबंध भारतात लहान मोठ्या २३ वखारी होत्या. त्यात ९० नौकर काम करीत होते. दिनांक

१३ फेब्रुवारी१६६५ या दिवशी पोर्तुगीजांकडून मुंबई बेट इंग्रजांस मिळालेइ.स. १६६८ मध्ये ते कंपनीच्या प्रत्यक्ष ताब्यात आले. त्या अगोदर ही इ.स. १६४१ मध्ये मद्रास इंग्रजांच्या ताब्यात आले होते शिवाय हुगळी येथे कंपनीची वखार होती. इ.स. १६६० ते इ.स. १७०७ पर्यंत बंगाल अखातातील व कॉरोमांडेल किनाऱ्यावरील सर्व ब्रिटिश वसाहतीचा कारभार (फोर्ट सेंट जॉर्ज) मद्रास येथून चालवत होता. इ.स. १७०७ मध्ये पश्चिम किनाऱ्यावर कान्होजी आंग्रे याने आरमाराच्या साह्याने आपली सत्ता प्रस्थापित केली. ह्या वेळेपर्यंत पोर्तुगीज आपल्या आरमाराच्या बळावर स्वतः सामर्थ्यवान समजत असत व समुद्रावर फिरणाऱ्या प्रत्येक जहाजास आपले दस्तक घेण्यास भाग पाडीत. आंग्रे यांचे प्रबळ आरमार पोर्तुगीज व इंग्रज यांच्या आरमाराशी मुकाबला करण्यास सज्ज झाले. आपले दस्तक परदेशी जहाजांनी घेतलेच पाहिजे हा दंडक आग्र्यांनी घातला. त्यावरून आंग्रे व पोर्तुगीज यांचे युद्ध जुंपले पोर्तुगीजांच्या मदतीस इंग्रजही धावून गेलेपण इंग्रजांची जहाजे कान्होजी ने पकडून नेल्यावर इंग्रजांनी आंग्रे यांच्याशीइ.स. १७१३ मध्ये शांतता तह केल्याचा दिसतो.

पोर्तुगीजांनी मुंबई इंग्रजांच्या ताब्यातदिल्यावरही आपले धार्मिक चाळे चालूच ठेवले. पोर्तुगीज पाद्रयाने इंग्रजांच्या हिताविरुद्ध वागणूक केल्याचे इंग्रजांना दिसून आल्यावर त्यास इंग्रजांनी हद्दपार केलेतरी पोर्तुगीजांनी उपद्रवी उद्योग चालूच राहिले. त्यांना आळा घालण्यासाठी पोर्तुगीज व इतर परकीयांनीमुंबई बेटावर कोणताही जमीन जुमला खरेदी करण्यास इंग्रजांनी मनाई केली. यावर पोर्तुगीज व्हाईसरॉयने आपला निषेध नोंदविला. हे प्रकरण मुंबई सरकारने कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलकडे लिहिले तेंव्हा इंग्रज-पोर्तुगीजांच्या सलोरव्याच्या तहास स्मरून इंग्रजांनी आपला वकील रॉबर्ट काडमन ह्यास गोव्यास नेमले. तसेच ठाणे व कारंजा येथील वाहतुकीचे मार्ग पोर्तुगीजांस खाली करून देण्यात आले.

इ.स. १७२१ मध्ये इंग्रज व पोर्तुगीज यांनी संगणमत करून कुलाब्यास आपल्या सैन्याचा वेढा दिला. इंग्रज व पोर्तुगीज यांना कान्होजी आंग्रे यांचे वर्चस्वनको होते. त्यामुळे दोघेही एकत्र होऊन आपापले सैन्य घेऊन कुलाबा या ठिकाणी गेले. इ.स. १७२९ मध्ये पोर्तुगीजांचा खोडसाळपणा मुंबईस चालू असल्याची नोंद आहेइ.स. १७३५ मध्ये मुंबईच्या प्रेसिडेंटने पोर्तुगीज गव्हर्नरला इंग्रजांच्या ठाणे व वसई येथे चाललेल्या व्यापारावर जकात घेऊ नये अशी विनंती केली. त्यास पोर्तुगीज गव्हर्नर ने मान्यता दिली. इ.स. १७३६ मध्ये पोर्तुगीज आरमाराने इंग्रजांचे एक व्यापारी जहाज पकडले ते सोडून देण्याविषयी मुंबई गव्हर्नराकडून विनंती येताच ते सोडून देण्यात आले इ.स. १७३७ मध्ये मराठ्यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातील वसई व साष्टी ह्या जागा सोडविण्यासाठी हल्ले चढविले. पूर्वीच्या मैत्रीच्या तहास अनुसरून आपल्या मदतीस धावून येण्याचे प्राचारण पोटदुखीजांनी मुंबईच्या इंग्रजास केले पण माणसे व शस्त्रास्त्रे पुरविण्याची पोर्तुगीजांची मागणी इंग्रजांनी नाकारली नाकारण्याचे कारण मराठ्यांच्या मुंबईवरील संभाव्य हल्ल्यासाठी माणसे व युद्ध सामग्रीची गरज आपणास लागेल हे दिले गेले.

ह्या नकारानंतर पोर्तुगीजकमांडरने मुंबईस येऊन प्रेसिडेंटची गाठ घेतली व मराठ्यांविरुद्ध लढण्यासाठी शस्त्रे बंदुकीची दारू बंदुका व लढवय्यी माणसे आपणास मिळावी अशी इंग्रजांकडे मागणी केली त्याच्या प्रत्यक्ष भेटीस किंचित यश येऊन इंग्रजांनी बंदुका व दारू देण्याचे कबूल केलेमराठ्यांस ही बातमी समजताच चिमाजी आप्पाने मुंबईकडे जाणारा अन्नधान्यसाठा अडवून धरला.

ठाणे व साष्टी बेटांवरील मराठ्यांचा हल्ला परतवून लावण्यासाठी आपण संयुक्त कारवाई करू या अशा प्रकारचे बोलणे पोर्तुगीजांनी इंग्रजांकडे लावले होते पण इंग्रजांनी त्या स्पष्ट नकार दिला मात्र इ.स. १७३९ मध्ये मराठ्यांनी वांद्रे वरसोवावर हल्ला केला असता इंग्रजांनी पोर्तुगीजांस गुप्तपणे शस्त्रास्त्रे व दारुगोळा पुरवून मदत केली पोर्तुगीजांना इंग्रजांनी मदत केली हे कळताच मराठ्यांचा सेनापती खंडोजी मानकर याने इंग्रजास त्यांनी पोर्तुगीजांना दिलेली मदत घेण्यास सांगितले तदनंतर १७४० मध्ये मराठ्यांचा पोर्तुगीजांशी जो सलोख्याचा तह झाला त्यास इंग्रज कॅप्टन इंचबर्ड मध्यस्थ राहिला व त्याच्या सल्ल्यानुसार पोर्तुगीजांनी मराठ्यांस चौल व मोरो या जागा दिल्या.

मराठे पोर्तुगीज युद्धात इंग्रजांनी पोर्तुगीजांच्या अंमलाखालील लोकांच्या होड्या पकडल्या होत्या त्या सोडल्या तसेच पोर्तुगीजांची छोटी जहाजे इंग्रजांनी पकडली होती ती ही इ.स. १७४२ मध्ये सोडून दिली. इंग्रज कंपनीचे पोर्तुगीजांना कर्ज झाले होते ते परत करण्यास आपण असमर्थ असल्याचे पोर्तुगीज व्हाईसरॉयने इंग्रजास कळविले ब्रिटिशांनी यावर उपाय शोधून काढला त्यांनी आपल्या कर्जाच्या फेडीपोटी पोर्तुगीजां कडील सर्व बंदुका जप्त केल्या मात्र पोर्तुगीजांनी कान्होजी आंग्रे यांनी पकडलेले इंग्रजाचे जहाज इ.स. १७५२ मध्ये परत मिळवून देण्यास मदत केली.

इ.स. १७५२ मध्ये इंग्रजांनी पोर्तुगीजांचे 'मेरी" .जहाज पकडले. म्हणून पोर्तुगीजांनी इंग्रजाचे 'डेक' जहाज पकडून ठेवले. पण यावर समझोता होऊन एकमेकांची जहाजे परत करण्यात आली.

**ब्रिटीशांचा गोवा द्वि - दमणवर ताबा :**

युरोपमध्ये राज्यक्रांती होत असताना फ्रेंच क्रांतिवीर इजिप्त ताब्यात घेऊन तेथून भारतात आपल्या फोजा घुसवून इंग्रजांना हुसकवून लावण्याचा विचार इ.स. १७७० पासून करत होते.[५] पण पोर्तुगीजांची भारतातील गोवा, दिव - दमण ही ठाणी ताब्यात घेऊन मगच इंग्रजांशी त्यांना हाकलून लावण्यासाठी मुकाबला करावयाचा ही कल्पना नेपोलियन बोनापार्टची त्याने ह्या आपल्या कल्पनेस मूर्तस्वरूप आणण्यासाठी म्हैसूरच्या टिपूशी संधान बांधले टिपूचे व इंग्रजांचे बरे नव्हते. टीपुणे इंग्रजांना भारतातून हाकलून लावण्याचा बेत रचला होता. त्याकरिता त्यास फ्रेंचांची मदत हवी होती. त्यासाठी त्याने नेपोलियनशी पत्रव्यवहार सुरू केला व फ्रेंचांशी दोस्ती केली. टिपूच्या सरहद्दीस लागून गोव्याची हद्द होती हल्लीचे सदाशिवगड गोवेकर पोर्तुगीजांच्या ताब्यात होते टिपूने दाखवून आपल्या ताब्यात घेतले पोर्तुगीजांचा मोझाबीकशी चाललेला व्यापार फ्रेंचांनी त्रास देऊन बंद पाडला. त्यांच्या जाचास कंटाळून पोर्तुगीजांनी इंग्रजांची मदत मागितली हे कळताच मॉरिशस व बोरबोन या ठिकाणाहून फ्रेंच जहाजे इंग्रज जहाजावर हल्ला करू लागली. इ.स. १७९३ ते १७९७ ह्या काळात अशा रीतीने इंग्रजांची १८०० जहाजे फ्रेंचांनी खतम केली.

या काळात दिवसेंदिवस युरोपांत फ्रेंच यांची सत्ता वाढत होती फ्रेंच जनरल मालटीक याने दि. १४ मे १७९७ रोजी जाहीर केले की आम्ही स्वतंत्र राहू किंवा मरू आम्ही टिपुशिवाय सर्वांना मानतो.[६] टिपूने दि. ३० जानेवारी १७९८ रोजीच्या आपल्या पत्राने फ्रेंचांना आपल्या दोस्तीच्या तहाचा आराखडा पाठविला. त्यानुसार जिंकल्यावर गोवा बंदर व गोव्याचा प्रदेश टिपु सुलतानकडे राहावयाचा होता. मुंबई बेट फ्रेंचांनी घ्यावयाचे होते यात पोर्तुगीजांकडून भारतातील त्यांच्या वसाहती जिंकून घेऊन त्यांच्याशी त्यांना मानहानीकारक तह करणे हा फ्रेंचाचा हेतू होता, तो इंग्रजांच्या लक्षात आला

टिपू सुलतान यांच्या मदतीने पोर्तुगिजांच्या वसाहतीबळकावणे व त्या ताब्यात आल्यावर इंग्रजांना हिंदुस्थानातून हाकलून देणे हा फ्रेंच यांचा डाव इंग्रज यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी पहिल्या प्रथम फ्रेंच सत्तेला पाचारण करणाऱ्या टिपूसुलतान यांचा काटा काढण्याचे ठरविले. आपले दोस्त निजामअली, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर यांना त्यांच्या नोकरीत असणाऱ्या फ्रेंच अंमलदारांना हाकलून देण्यास सांगितलेतसेच गोवा, दीव व दमण येथे इंग्रज सैन्य ठेवण्याचाही निर्णय कलकता कौन्सिलने घेतला. दि. ४ मे १७९९ रोजी श्रीरंगपट्टणच्या हल्ल्यांत टिपू सुलतान मारला गेला आणि दि १४ ऑगस्ट १४९९ रोजी ब्रिटिशांनी जेसू उथीफ नावाचा आपला वकील गोव्यात पाठविल्याचे दिसते. ह्या अगोदर ब्रिटिशांनी कारवार नजीकच्या अंकोल्याचा ताबा घेतला असल्याचे दिसते. तसेच मुंबईचा गव्हर्नर जोनाथन डंकन याने गोवा ताब्यात घेण्यासाठी एक हजार युरोपियन सैनिक सात लढाऊ जहाजातून कर्नल विल्यम कलार्कच्या अधिपत्याखाली रवाना केले. हे इंग्रजी सैन्य दि. ६ सप्टेंबर १७९९ रोजी गोव्यास पोहोचले. इ.स. १८०१ मध्ये ब्रिटिश सैन्याने दीव-दमणच्या किल्ल्यांचा ताबा त्यांच्या संरक्षणार्थ घेतला[७]

ब्रिटिश सैन्याने गोव्यात तळ दिला, तसेच दीव, दमण ताब्यात घेतले हे गोव्याच्या गव्हर्नरला आवडले नाही. त्याने ह्या कृत्याबद्दल आपली नापसंती इंग्रज वकिलाकडे व्यक्त केली अग्वादच्या किल्यात राहण्यासाठी ब्रिटिश सैन्यास जागा देण्यात आली. पण त्या किल्ल्याच्या डागडुजीचा खर्च इंग्रजांनी सोसला इंग्रजांचा वकिल गोव्यात होता फ्रेंचांचे आरमारी गलबत पोर्तुगिजांना गोव्याबाहेर पाण्यात दिसल्यावर त्यांनी मुंबईकर इंग्रजांस सैन्य व दारुगोळा यांची मदत करण्यास विनंती केलीती मान्य करण्यात आली. इंग्रजी सैन्य गोव्यात असेपर्यंत गोव्याच्या रयतेस अन्नधान्य स्वस्त दराने पुरविण्याचे काम ब्रिटिशांनी केले. ब्रिटिश फ्रेंचांचा पराभव करण्यासाठी पोर्तुगिजांच्या वसाहतीरक्षणार्थ धावून गेलेहे फ्रेंच राज्य कर्त्यास समजताच त्यांनी दि. १७ फेब्रुवारी १८०४ रोजी पोर्तुगिजांशी तह करून इंग्रज- फ्रेंच युध्दात पोर्तुगिजांची तटस्थता मिळविली याच सुमारास मकाव येथील पोर्तुगिजांनी ईस्ट इंडिया कंपनीचे आरमारी क्रुझर'अन्टीलोप' याच्या बाबतीत दंडेली केली. हे गोव्याच्या गव्हर्नरास कळताच त्याने मकावच्या अधिकाऱ्यांस दम दिला. इ.स. १७९९ ते १८१५ पर्यंत ब्रिटिश सैन्य गोव्यात होते. ब्रिटिश वकीलही वरील काळात गोव्यात राहत होता. त्याचा मुंबई गव्हर्नरशी जो ह्या काळात पत्रव्यवहार झाला तो गोवा इन्व्हॉय रेकॉर्ड म्हणून मुंबई रेकॉर्ड ऑफिसमध्ये पब्लिक डिपार्टमेंट क्र. ६०३ ते ६१० एवढया डायऱ्यांत सामावलेला आहे. हा पत्रव्यवहार इ.स.१८०३ ते इ.स. १८१५ पर्यंतचा आहे. गोव्यात असलेला ब्रिटिश वकील मालवणकरांच्या जहाजांनी केलेली लूट निवतो बंदरात ब्रिटिश फतेमारी पकडली त्याचा रिपोर्ट, गोव्यात पैदा होणारे मीठ आणि त्याचा व्यापार, इत्यादीबद्दल मुंबईस लिहितांना आढळतो खेरीज गोव्यात राहिलेल्या ब्रिटिश सैनिकांचे पगार त्यांच्यावर सोपविलेली कामागिरी, गोव्यातील त्यांची सेवाचाकरी ह्या सर्वाबद्दल वकिल लिहितो. ब्रिटिशांच्या जेव्हा लक्षात आले की कोल्हापूर राजा व इतर मराठे सरदार यांच्या सेवेत काही पोर्तुगीज आहेत तेंव्हा त्यांनी गोव्याच्या गव्हर्नरला सांगून त्यांना परत बोलावण्यास लावले इ.स. १८०७ मध्ये फ्रेंचांच्या हल्ल्याची भीती जास्त वाटल्यानेच मुंबई कोन्सिलने मद्रासेतून गोव्यास कुमक करण्याचा ठराव केला इ.स. १८१५ मध्ये फ्रेंचांशी शांततेचा तह झाल्यानंतर ब्रिटिशांनी आपले गोवा, दीव दमण येथील सैन्य मागे घेतले.

मुंबई दप्तरखान्यातील पब्लिक डिपार्टमेंट सिरीजमध्ये पोर्तुगिजानी चर्चची बांधकामे मुंबईत घेऊन त्याद्वारे धार्मिक व

इंग्रजांचे विरुध्द प्रचार केल्याचे आढळते इंग्रजांनी कोल्हापूरकर व सावंतवाडीकर यांना आपले मांडलिकत्व स्वीकारण्या लावून त्यांच्या संरक्षणाची हमी दिली होती या उलट पोर्तुगिज सावंतवाडी व कोल्हापूर राज्यांचे लचके तोडण्याचे प्रयत्न इस. १८१२ ते १८२० ह्या काळात करु लागले. त्यापुढे ही त्यांच्याशी पोर्तुगिजांच्या कलागती चालूच राहिल्या ह्या कलागती मिटविण्याची कामगिरी ब्रिटिशांना करावी लागे. ह्या कटकटी कायमच्या मिटाव्या म्हणून ब्रिटिश सरकारने गोवा, दीव व दमण ही विकत घेण्याचे ठरविले. इ.स. १८३८ मध्ये सावंतवाडीमध्ये बंड झाले बंडखोरांचा पाठलाग करण्यात आल्यावर त्यांनी गोव्यात आश्रय घेतला त्यावेळी इंग्रजांनी पोर्तुगीज वसाहती पाच लक्ष पौंड एवढ्या किमतीत विकत घेण्याचे ठरविल्याचे दिसते.

**सारांश:-**

सोळाव्या शतकात पोर्तुगीज व इंग्रज भारतात आल्याचे दिसतात त्यानंतर दोन ही सतेने भारतात साम्राज्य विस्ताराचे धोरण आरंभिल्याचे दिसते. साम्राज्यविस्तार करत असताना या दोन सतेमध्ये कधी संघर्षाचे तर कधी सोहार्दपूर्ण संबंध राहिल्याचे दिसते. पोर्तुगीज आणि इंग्रज यांनी भारताची आर्थिक लयलूट करून स्वतःच्या सतेचा अधिक विस्तार केल्याचे दिसते. इंग्रज व पोतृर्गिज यांच्यात इस. १६३८ पर्यंत संघर्ष चालू असल्याचे दिसतात इंग्रजांनी पूर्ण भारतभर इंग्रजी सत्तेचेविस्तारीकरण केले तर पोर्तुगीजांनी गोवा, दिव दमनपर्यंत मर्यादित सतेचा विस्तार केल्याचा दिसतो.

**संदर्भसूची: -**

१) डनव्हर्स ई.सी., द पोर्तुगीज इन इंडिया, खंड-२, पृष्ठ २००

२) किता, पृष्ठ २२१, २२

३) भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, वर्ष १४ वे, १९७७, मुंबई पृष्ठ ८४

४) डॉ. पिसुर्लेकर पी.एस., पोर्तुगीज मराठे संबंध, भारतीय आणि इतिहास संस्कृत मंडळ, महाराष्ट्र राज्य, प्रथम आवृत्ती, जून १९८३, मुंबई, पृष्ठ १४०

५) डॉडवेल एच.एच., द कॅब्रीज हिस्ट्री ऑफ इंडिया,खंड- ५, १९२९, पृष्ठ ३२७

६) हासन मोहिबुल, हिस्ट्री ऑफ टिपू सुलतान, १९७१, कलकता, पृष्ठ २९३

७) किता, २९९